**विषय : महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२५ अंतर्गत प्रोत्साहनांच्या वितरणासाठीची परिचालनीय मार्गदर्शक तत्वे.**


**परिवहन आयुक्त कार्यालय,**

५ वा मजला, फाऊंटन टेलिकॉम बिल्डिंग क्र.२,

हुतात्मा स्मारक चौक, एम.जी. रोड, मुंबई-४००००१

संपर्क क्र.: ०२२-२२६१४७२६ Email – dycommr.enf1@gmail.com, dytcenf1.tpt-mh@gov.in


क्रमांक- एमव्हीआर-०४२५/सीआर-०१११/का.२(३)/जा.क्र. 9068 दिनांक :- 28 JUL 2025

**संदर्भ :** १. शासन निर्णय क्र. एमव्हीआर-०१२५/प्र.क्र.१३/परि-२, दि.२३.०५.२०२५.

२. या कार्यालयाचे परिपत्रक क्र.४१/२०२५, क्रमांक-एमव्हीआर-०४२५/सीआर-०१११/का.२(३) /जा.क्र.७३४९, दि.१९.०६.२०२५.

३. शासन पत्र क्र.एमव्हीआर-०७२५/प्र.क्र.३८८/परि-२, दि.११.०७.२०२५.

४. मा. श्री. नितीन गडकरी, मा.केंद्रीय मंत्री, सडक परिवहन व राजमार्ग मंत्रालय यांनी मा. मंत्री (परिवहन) यांना अग्रेषित केलेले दिनांक ०४.०७.२०२५ रोजीचे पत्र.

## परिपत्रक क्र. ..53/.2025

महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण-२०२५ अंतर्गत प्रोत्साहनांच्या वितरणासाठी उपरोक्त नमूद परिपत्रक क्र.४१/२०२५, दि.१९.०६.२०२५ द्वारे परिचालनीय मार्गदर्शक तत्वे जारी करण्यात आली होती. सदर परिचालनीय मार्गदर्शक तत्वांमधील शासनाकडून प्राप्त सूचनांनुसार मुद्दा क्र.१ बाबत खालील प्रमाणे स्पष्टीकरण जारी करण्यात येत आहे.

दि.२३.०५.२०२५ ते दि.१९.०६.२०२५ या कालावधीत राज्यात नोंदणी झालेल्या इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहने देण्याची जबाबदारी मुळ उत्पादक/वितरक यांची राहील, असे प्रोत्साहने दिल्याचे प्रमाणपत्र मुळ उत्पादक यांनी MHEV Portal वर अपलोड करावे. या संदर्भात आवश्यक असल्यास वरील कालावधीतील सुधारित बिजक काढण्यात यावे.

MHEV Portal कार्यान्वित झाल्यानंतर सर्व इलेक्ट्रिक वाहन उत्पादकांना दि.२३.०५.२०२५ ते पोर्टल कार्यान्वित होईपर्यंत नोंदणी झालेल्या वाहनांचे दावे पुढील ३० दिवसांची आत सादर करणे अनिवार्य असेल.

**(विवेक भीमनवार) भा.प्र.से.**
**परिवहन आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**प्रत :**

१) मा.अपर मुख्य सचिव, गृह (परिवहन) विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव.

२) सर्व नियंत्रक अधिकारी, परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांना आवश्यक कार्यवाहीसाठी.

३) सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी/उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना आवश्यक कार्यवाहीसाठी.

४) सर्व इलेक्ट्रिक वाहनांचे उत्पादक यांना महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण-२०२५ अंतर्गत प्रोत्साहने वितरीत करणेसाठी.